# TickMark.Ai
Mumbai

**Class:** EM - CLASS 10 | **Subject:** Marathi | **Time:**1 hrs
**Date:** 04-08-2025 | **Paper:** Unit 1 (Solution) | **Marks:**20

**Q1)**

**(1)** (1) (i) कृष्णा
(ii) मासेमारी
(2) शाळ, श्रीफळ
(3) शालीनता म्हणजे नम्रता. प्रत्येक व्यक्तीमध्ये हा गुण असणे महत्त्वाचे आहे. कारण शालीन व्यक्ती कितीही यशस्वी झाली तरी, अहंकाराने, उद्धटपणाने वागत नाही. या शालीनतेमुळे लोकांनाही त्यांच्या बद्दल प्रेम वाटू लागते त्यामुळे सर्वांच्या मनात स्वत: चे एक अढळ स्थान निर्माण करू शकतात. 'साधी राहणी उच्च विचारसरणी' ही म्हण यांच्यासाठी अगदी सार्थ ठरते. त्यामुळे लता मंगेशकर, प्रकाश आमटे किंवा सचिन तेंडुलकर सारख्या व्यक्ती नेहमीच आपल्याला हव्याहव्याश्या वाटतात.

**Q2)**

**(1)** (1) (i) बाळ आगीच्या तडाख्यात सापडते तेव्हा.
(ii) आपली पिले धरणीवर कोसळताच
(iii) भुकेल्या वासराच्या आवाजाने.
(iv) जंगलात वणवा लागताच आपल्या पाडसाच्या काळजीने.
(2) (i) नामदेव महाराज
(ii) चातक
(iii) वासरू
(iv) परमेश्वर
(3) 'धार उडे आकाशी, चित्त तिचे पिलापाशी' या उक्तीप्रमाणे मानव, प्राणी किंवा पक्षी या प्रत्येकाचेच आपापल्या अपत्याच्या संरक्षणाकडे विशेषकरून लक्ष असते. चराचर सृष्टीतील ही वास्तविकता नामदेव महाराजांनी आपल्या अंकिला मी दास तुझा' या अभंगात वर्णन केली आहे. ममता किंवा मातृत्व ही कल्पना मानव व मानवेतर प्राणी या सर्वांमध्येच दिसून येते. स्त्री ही चाहाल्यांसाठी प्रसिद्ध आहे. कोणत्याही मातेचे बाळ अग्नीमध्ये म्हणजेच संकटांत सापडणे ही कल्पनासुद्धा ती सहन करू सकत नाही. अशी ही दयाळू आई खरोखरच जर बाळ 'अग्नीमध्ये' सापडले तर आगीत उडी ध्यायलासुद्धा तयार असते आणि अशीच ममता मानवेतर प्राण्यांमध्येसुद्धा दिसून येते. वासराच्या केवळ हंबरण्याच्या आवाजाने गाय वासराजवळ जाऊन त्याची भूक भागविते याप्रमाणेच पक्षिणीसुद्धा तिचे मातृप्रेम दाखवून देते. पिळू जमिनीवर पडताक्षणीच पक्षिणी त्याच्याकडे झेपावते या वरून मातृप्रेमाची भावना / मानव व मानवेतर प्राणी सर्वांकडे सारखीच असल्याचे दिसून येते.
(4) "तैसा धांवें माझिया काजा। अंकिला मी दास तुझा॥" ही काव्यपंक्ती नामदेव महाराजांनी लिहिलेल्या 'अंकिला मी दास तुझा या अभंगातील असून यात परमेश्वराचे आपल्याकडे लक्ष वेधून घेण्यासाठी नामदेव महाराज मनापासून प्रार्थना करतात. आगीत सापडलेल्या बालकाची स्वत:मध्ये भूमिका स्वत:मध्ये पाहत ते परमेश्वराला म्हणतात की संकटात सापडलेल्या बालकाकडे म्हणजे भक्ताकडे धावत येतो हे तुझे कर्तव्य आहे कारण मी तुझा अंगीकारलेला दास आहे आणि हे परमेश्वरा तू माझा स्वामी आहेस, माझे संकट हे तुझे संकट आहे असे समजून मायेच्या ममतेने तू या बालकाकडे नक्कीच धावत येशील.'

**Q3)**

**(1)** अंगावर खवले असणारा - खवलेकरी
**(2)** (i) पैसा - पैसे
(ii) नाला - नाले
**(3)** (1) लहान x मोठे (2) ज्ञान x अज्ञान
**(4)** ताई बुटकी नाही.
**(5)** (i) वासरू - नंपुसकलिंग
(ii) चिमणा - पुल्लिंग

All the Best

TickMark.Ai